Vol 3 Issue 6 Dec 2013

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-6, Dec-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

# संत साहित्याचे योगदान

*संजय जनार्दन आगलावे*

जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालय,दर्यापूर.

**सारांश :** संत साहित्याचे भारतीय समाजाला दिलेले योगदान फार मोठे आहे. संतानी केलेल्या कार्याची अखंडता केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादीत नाही संपूर्ण देशाला संतानी विचार दिलेला आहे, महाराष्ट्र संताची भुमी म्हणून ओळखली जाते संताच्या कार्याचा गौरव बहिणाबाईनीं केलेला आहे.

**प्रस्तावना :–**

'' ज्ञानदेवे रचिला पाया
तेने उभारीले देवालया
नामा तयाचा किंकर
तेने केला हा विस्तार
जनार्दनी एकनाथ
स्तंभ दिला भागवत
भजन करा सावकाश
तुका झालेसे कळस

अशा प्रकारे अध्यात्मिक क्षेत्रात लोकशाही निर्माण करण्याचे कार्य संतानी केले समाजातील सर्व स्तरातील स्त्री पुरुषांसाठी नामस्मणाच्या सोप्या माध्यमातून भक्तीचा मार्ग खुला केला. सर्व ज्ञान, धर्म यांच्या बाबतीत मागे पडलेल्या आत्मविष्वास गमावलेल्या अठरापगड जातीतील लोकांना भक्तीमार्ग दाखवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखा मेळा, सावतामाळी, सोयराबाई, निर्मला, कान्होपात्रा , बहिनाबाई इत्यादी संत कवित्रींनी अभंग रचना केली.

ज्ञानेश्वरादी भावंडांना सन्याशाची मुले म्हणून वाळीत टाकण्यात आले समाजाच्या असंवेदनशीलतेचा फटका त्यांना बसला धर्म व्यवस्था त्यांना न्याय देण्यासाठी कुचकामी ठरली चोखामेळया सारख्या संताला यातिहिनतेचे दुःख भोगावे लागले. आपण यातीहीन आहोत म्हणून आपली अवहेलना होते दुःख भोगावे याबद्दल जाणीव त्यांनी व्यक्त केली आहे.

यातीहीन मज म्हणती देवा
न कळे करुं तुमची सेवा
आम्हा नीचाचे ते काम
वाचे गावे सदा नाम
उच्छीष्हाची आस

चोखामेळया सोबतच त्याची पत्नी सोयराबाई, मुलगा कर्मा, बहीण निर्मळा हे सर्वजण अभंगरचना करतांना दिसतात. संतमंडळीच्या संगतीने त्यांच्या प्रोत्साहनामुळे अभंगरचना करण्याची प्रेरणा त्यांना मिळतांना दिसते उस डोंगा परी रस नव्हे डोंगा, इत्यादी अभंगातून चोखा आपली नाही खंत व्यक्त करतो पण विद्रोहाची भावना त्याच्या अभंगात दिसत नाही परंपरेला शरण जाण्याची त्याची मानसिकता आहे. अनेक युगाच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीने त्याचे जीवन व्यापून टाकले आहे. असे असले तरी आपल्या मनातील जाणीव व्यक्त करण्याची तरी ताकद त्यांना या संत सानिध्याने आली आहे हे निश्चित मानावे लागेल.

चोखोबाची धर्मपत्नी सोयराबाईहीचे स्थान सुध्दा संतसाहित्यात लक्षणीय आहे ज्ञानेश्वर , नामदेवांच्या साहित्यात त्यांना आत्मळ प्राप्त होत ती म्हणते

देहासी विटाळ म्हणतीसकळ ! आत्मा तो निर्मुळ शुध्दबध्द !!
देहाचा विटाळ देहीच जन्मला ! सोवळा तो झाला कवण धर्म !!

सोयराबाईचा हा अभंग देहाचे वास्तव सांगणारा आहे, यादृष्टीने विचार केल्यास कोणीच विटाळाला टाळू शकत नाही त्यामुळे देहावरुन एखाद्याला यातीहीन ठरवता येत नाही आत्मा हा शुध्द आहे त्याला विटाळ होत नाही हे तत्व तीने स्पष्टपणे मांडले आहे. पंढरीचे ब्राम्हण चोखामेळाचा छळ करतात या दुःखाच्या जाणीवेतून ती बाहेर पडण्याचा प्रयत्न करते त्यामुळे ब्राम्हण त्यांच्या घरी जेवायला येणे चोखोबांच्या घरी ऋध्दी – सिध्दी तिष्ठू लागल्या वैष्णवांचे आनंदाने कीर्तन सुरु झाले, देव आकाशातून आनंद सोहळा बघु लागणे हे सर्व ती आपल्या अभंगातून रंगवते या दुःखाच्या भावनेतून सावरण्यासाठी हे प्रसंग तीचा आधारभूत ठरतात.

या सर्व संतकवियित्रीत लक्षणीय नाव म्हणजे संत जनाबाई नामयाची दासी म्हणतून घेणारी ही दासी म्हणून जीवन व्यथीत करणारी सामान्य स्त्री संत संजन्नाच्या संगतीने अभंगवाणी लिहते आणि सामान्याकडून असामान्याकडे झेप घेते, तेव्हा थक्क व्हायला होते समाजाच्या दृष्टीने विचार केला तर सर्व ठिकाणी तीला दुय्यम स्थान आहे कुटूंबाचा आधार नाही, शिक्षण नाही, दासी म्हणून होणारी अवहेलना, एकाकीपणा या सर्वामुधन जर तीला कोणाता आधार असेल तर तो संत नामदेवासारख्या संताच्या त्यांच्या कुटूंबात वावरत असतांना तीला विठ्ठलनामाची गोडी वाटते.

नाम विठोबाचे घ्यावे ! मग पाऊल टाकावे
येग येग विठाबाई ! माझे पंढरीचे आई
झाडलोट करी जनी ! केर भरी चक्रपाणी
धरिला पंढरीचा चोर ! गळा बांधोनिया दोर !!

नामददेवाचे कुटूंब तीने आपले मानले त्यांच्या कुटूंबाशी एकरुप झाली विठ्ठलाला सखा मानले, नामदेवामुळे विठ्ठलाचे दर्शन घडले हा तीला विश्वास आहे असे असले तरी लौकीक जीवनात तीला दासीपण आणि स्त्रीपण यामुळे मानहानी भोगावी लागत होती. त्यामुळे कधीकधी विठ्ठलाचा तीला राग येतो सात्वीक संतापाने तीचे मन पेटून उठते आक्रमक भाषेत विठ्ठलाला आव्हान ती देते.

'' डोईचा पदर आला खांद्यावरी ।
पदर आला खांद्यावरी ।।1।।
भरल्या बाजारी जाईन मी ।।
हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा ।
आता मज मना कोण करी... ।।2।।
पंढरिच्या पेठे मांडियेले पाल ।
मनगटावर तेल घाला तुम्ही ।।3।।
जनी म्हणजे देवा मी जाले वेसवा ।
रिधाले केशवा घर तुझे ।।4।।

या अभंगात जनाबाईच्या व्यक्तीमत्वाचे दर्शन घडते, जनाबाईच्या आक्रमक व्यक्तीमत्वाचे दर्शन आश्चर्यचकित करते ज्या विठ्ठलाला आपले सर्वस्व मानले, जगण्याचा आधार मानला ज्यावेळी जनाबाईचा स्वाभिमान दुखावला जातो अशा निर्वाणीच्या वेळी सुध्दा विठ्ठल मदतीला येत नाही, तेव्हा सात्वीक संतापाने तीचे मन पेटून उठते आणि ती प्रत्यक्ष विठ्ठलाला बंडखोरीच्या भाषेत सुनावते.

स्त्रीजन्म प्राप्त झाला म्हणून भोगावे लागणाऱ्या यातनांची जाणीव तीला आहे पण अध्यात्मीक वाटचालीत स्त्रीपण अडसळ ठरत नाही हा विश्वास तीला आहे म्हणून समस्त स्त्रीयांना ती आश्वस्त करु इच्छीते.

स्त्रीजन्म म्हणवूनी न व्हावे उदास
साधुसंता ऐसे केले मज ।। 1।।
संतांचे घरची दासी मी अंकिली
विठोबाने दिली प्रेम कळा ।। 2।।

संत जनाबाईच्या अभंगातून स्त्रीत्ववाचे वात्सल्याचे दर्शन घडते आई आणि त्यांची मुले विठ्ठल आणि त्यांचे भाव यांच्यातील नातेसंबंधातील जिव्हाळयाचे वर्णन जनाबाईनी अतिशय जीव्हाळयाने केलेले आहे.

पक्षी जाय दिगंतरा ! बालकांसी आणि चारा !!
घार हिंडते आकाशी ! झेप घाली पिल्यासाठी !!
माता गुंतली कामासी ! चित्त तिचे बाळापाशी !!
वानर हिडे झाडावरी ! पिली बांधुनी उदरी !!!
तैसी आम्हासी विठ्ठलमाये ! जनी वेळोवेळा पाहे !!

या अभंगातून वात्सल्याचे मुर्तीमंत चित्र जनाबाईने साकार केले आहे, ज्याप्रमाणे सर्व प्राणीमात्रात वात्सल्य दिसते त्याप्रमाणे जनाबाई सारख्या सदैव ईश्वराच्या नामस्मरणात रममाण झालेल्या संताना विठ्ठल वेळोवेळी वत्सलतेने बघत असतो.

जनाबाईच्या जीवनात अनेक मानहानी सहन करणारे प्रसंग आले, स्त्री आणि दासी या दोन्हीकडे समाजाच्या बघण्याच्या दृष्टीकोनाचा फटका तीला बसला समाजातील जातीव्यवस्थेमुळे जे दुःख सोसावे लागते याची खंत तीला आहे चोखामेळ्या सारख्या संताबद्दल तीला आत्मीयता आहे, त्याने देव बाटविला ही कल्पना तिला हास्यास्पद वाटते, संतानी व्यापक भुमिका घेतली आहे. जात, धर्म, पंथ यामध्ये स्वतःला संकुचित केले नाही. संतानी केलेल्या कार्याची ग्वाही आजही संपूर्ण महाराष्ट्र देतो ज्ञानेश्वरांनी लिहलेली ज्ञानेश्वरी, नामदेव, तुकाराम इत्यादी संताच्या नामाचा जल्लोष करुन विठ्ठलाच्या दर्शनासाठी दरवर्षी वारी करतात, संत ज्ञानेश्वरांनी केलेले कार्य अक्षर आहे त्यांची ज्ञानेश्वरी अक्षर वाड्मयाचा दर्जा प्राप्त झालेली आहे. अशा प्रकारे ज्ञानेश्वराचे कार्य अद्वितीय , अद्भूत आहे. आजही ज्ञानेश्वरांची साहित्य संपदा संशोधकांना , भक्तांना, अभ्यासकांना, समाजातील सर्व स्तरातील लोकांना प्रेरणा देत आहे.

ज्ञानेश्वरासोबतच संत नामदेवाचेही कार्य महत्वपूर्ण ठरते. कीर्तनाच्या माध्यमातून जनतेत प्रबोधन घडवून आणण्याचे कार्य नामदेवांनी केले.

'' नाचू कीर्तनाचे रंगी !
ज्ञानदीप लावू जगी ''

अज्ञानाचा अंधःकार दूर करुन ज्ञानदीप लावण्याची आकांशा नामदेवांनी बाळगली, नामदेवासारख्या संतांनी चमत्कारावर विश्वास न ठेवता भक्तीच्या मार्गातून कीर्तनातून भक्ती वैराग्य, सदाचार यांचा प्रचार , प्रसार महाराष्ट्रातच नव्हे तर थेट पंजाबपर्यंत केला. विठ्ठलाचा विरह, त्याच्या भेटीची ओढ आहे. पंढरपूरचे वास्तव्य, चंद्रभागेतस्नान व विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ त्यांना सातत्याने आहे म्हणून ते म्हणतात.

पंढरीचा वास चंद्रभागे स्नान ।
आणिक दर्शन विठोबाचे ।।
हे चि घडो मज जन्म जन्मांतरी ।
मागणे श्रीहरी नाही दुजे ।।

ज्ञानदेव आणि नामदेव यांनी तीर्थयात्रेच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या बाहेर अनेक ठिकाणी भेट दिल्या. तीर्थयात्रेतून परत आल्यावर ज्ञानदेवांनी समाधी घेतली नामदेवांनी ज्ञानेश्वरांच्या चरित्राचे वर्णन करणारे आदि, तीर्थावळी आणि समाधी अशा तीन विभागात विभागलेले अभंग लिहले,. समाधीच्या अभंगातील दुःखाचे कारुण्याचे, वर्णन ह्रदय हेलावून हाकणारे आहे.

नामदेवांनी आरतीची रचना केलेली आहे आरती म्हणजे आर्त स्वरात भक्ताने केलेली देवाची प्रार्थना किंवा विनंती आरतीच्या माध्यमातून पंढरीतील वारकरी विठ्ठलभक्तीच्या सोहळ्यात रममाण होतात युगे अठ्ठावीस ही नामदेवांची आरती विठ्ठल भक्तात वारंवार म्हटली जाते, श्रीगुरुग्रंथसाहिब हा शीखांचा धर्मग्रंथ आहे, यात नामदेवांची एकसष्ट हिंदी पदे समाविष्ट आहे.

संत एकनाथाचे कार्य अतिशय मोलाचे आहे. सांस्कृतिक क्रांतीचा पाया त्यांनी आपल्या भारुडातून रचला केवळ अभंगरचना करुन ते थांबले नाही तर, तर भारुडाच्या माध्यमातून समाजचित्र उभे केले महार, गारुडी, वासुदेव, कुंटीण जागल्या इत्यादी लोकांच्या चालीरीती समाजातील अगदी खालच्या थरातील भारुडातून सर्व सामान्याचे रंजन करतांना त्यांना अध्यात्म विचार आणि नैतिक बोध त्यांनी घडविला खेड्यापाड्यापर्यंत नाथांची भारुडे पोहचली व अवलोकन क्षमता व सहानुभव लक्षात येतो, आपल्या आख्यान काव्यातून त्यांनी समाजदर्शन घडवले केवळ शांत आणि भक्तीरसाचे सम्राज्य असणाऱ्या मराठी कवीतेला श्रृंगार, हास्य ऐवढेच नव्हेतर वीर रसाची सुध्दा साथ नाथामुळे मिळाली. ज्ञानेश्वरानंतर सुमारे 300 वर्षांनी महाराष्ट्रांच्या सांस्कृतीक जीवनाचे पुनरुत्थान घडविण्याचे कार्य त्यांनी केले. प्रपंच आणि परमार्थ यांची सुंदर सांगड त्यांनी घातली, सामाजिक निती , परंपरा, आचार , विचार यांचे दर्शन त्यातून घडते.

भवानी आई रोडगा वाहीन तुला सारख्या भारुडातून त्यांनी विद्रोही कल्पना साकार केली आहे, कलीने संचार केलेल्या सुनीच्या मनातील दाहकता प्रस्तुत भारुडातून त्यांनी साकार केली आहे. सोबतच समाजाला चित्र रुपाने, नाटक रुपाने दाखविली आहे. भारुडासोबतच एकनाथी भागवत हे संत एकनाथांच्या व्यक्तीमत्वाचे दर्शन घडवीणारे आहे. यातून वारकरी पंथाला त्यांनी आधार देण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

संतश्रेष्ठ तुकारामांच्या अभंगांनी संपूर्ण मराठी मनाला चेतना देण्याचे कार्य केले कधी समाजस्थितीची विदारकता तर कधी दांभीक साधु संतावर निर्वाणीचा हल्ला, तुकारामांच्या शब्द सामर्थ्याने अलौकीक कार्य केले आहे, आम्हा घरी धन शब्दाचीच रले !! सारख्या अभंगामधुन त्यांची काव्यदृष्टी स्पष्ट होते शब्द हेच आपले सर्वस्व आहे, तेच आपले दैवत आहे हे स्पष्ट होते.

तुकारामांची कविता लोकभाषेतून साकार झाली हे खरे आहे, पण त्यांच्या अभंगाला त्यांची स्वतःची अशी भाषा लाभलेली आहे, ते जी भाषा बोलतात तीच भाषा त्यांच्या अभंगाला लाभलेली आहे. ग्रामीण भागातील जनमानसाला त्यांची भाषा आपली वाटते त्यांचे अभंग जीवनाचे सार वाटतात जगण्यासाठी आधारभूत वाटतात.

***संदर्भ ग्रंथ सूची :—***

1) संत वाड्मयाची सामाजिक फलश्रृती — गं.बा. सरदार श्री विद्या प्रकाशन पुणे चतु.आ 1982 रां.गो.तुळपुळे
2) पाच संतक वी — व्हीनस प्रकाशन, पुणे आ 2—1962
3) प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास — अ.ना. देशपांडे व्हिनस प्रकाशन, पुणे आ. 1966
4) संत कवयित्री जनाबाई चरित्र, — दा. बा. भिंगारकर प्रथमावृत्ती, मॅजेस्टिक प्रकाशन, काव्य आणि कामगिरी मुंबई 198

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org